माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

**क्र.मुमाआ/नों.क्र.७८७८/२१/अ.क्र.१२७७/२५/०१**

**श्री. प्रकाश अनंत दाभाडे**
आय/१०४ श्री. दत्त दिगंबर सह.गृह संस्था,
पंतनगर घाटकोपर मुंबई-४०००७५

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता (सा.बां.)**
उपविभाग कुर्लासार्वजनिक बांधकाम विभाग,
४६, लाल बहादूर शास्त्री मार्ग, कमानी, नवा पाडा,
कुर्ला पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र ४०००७०

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (सा.बां.)**
उपविभाग कुर्लासार्वजनिक बांधकाम विभाग,
४६, लाल बहादूर शास्त्री मार्ग, कमानी, नवा पाडा,
कुर्ला पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र ४०००७०

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०६.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०२.२०२१ | - | ०१.०४.२०२१ | - |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.०२.२०२१ रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "इमारत क्र. १८६ सरकारी अधिकारी निवासस्थाने पंतनगर घाटकोपर पूर्व याठिकाणी सूरू असलेल्या दुरूस्ती संदर्भात" माहितीची मागणी केलेली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांचे उत्तर नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

अपीलार्थी यांनी दि. ०१.०४.२०२१ रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "उपलब्ध झालली माहिती अर्धवट स्वरुपात तसेच दिशाभूल करणारी आहे", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांचे आदेश नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि.०६.०७.२०२१ रोजी "अद्याप कोणतीही सुनावणी घेण्यात आलेली नाही.", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि. १८.०६.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता (सा.बां.) विभाग व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (सा.बां) विभाग यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता (सा.बां) विभाग यांनी अपिलार्थी यांना दिलेली माहिती ही कोणत्या स्वरूपाची आहे. म्हणजे नेमकी कोणती माहिती दडवण्यात आली आहे याचा कुठलाही अर्थ बोध होत नाही. तसेच, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (सा.बां.) विभाग यांच्या वतीने दि.०१.०४.२०२१ रोजीच्या अर्जावर दि.१४.०६.२०२१ रोजी सुनावणीत आयोजित करण्यात आल्याबाबत सूचना आढळून येते. त्यामुळे, सदर सुनावणी झाली किंवा कसे याबाबत देखील कुठल्याही खुलासा सादर करण्यात आलेला नाही. अपिलार्थींनी सदर सुनावणीबाबत कुठलाही पाठपुरावा केला असल्याबाबतचे आढळून येत नाही. आज झालेल्या सुनावणी अपिलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सुचना न देता अनुपस्थित आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, अपिलार्थींना उपरोक्त माहिती प्राप्त करून घेण्यास कोणतेही स्वारस्य नसल्याचा निष्कर्ष काढून प्रस्तुत अपिल निकाली काढून नस्ती बंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८.०६.२०२५**

State Information Commission ★ Maharashtra ★

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**